



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक २० वा ● गुरुवार ०६ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 20 | Date : 06/06/2024 blow Thursday Page 4 Price 4

## नरेंद्र मोदींनी दिला पंतप्रधानपदाचा राजीनामा



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी दुपारी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. कॅबिनेटच्या बैठकीत लोकसभा विसर्जित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. हा प्रस्ताव राष्ट्रपतींकडे सादर केल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा मंजूर केला आहे. नवीन सरकार येईपर्यंत ते काळजीवाहू पंतप्रधान असतील. लोकसभा निवडणुकीत एनडीएला ३९२ तर इंडिया आघाडीला २३४ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे देशात पुन्हा एनडीएची सत्ता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार बुधवारी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची बैठक झाली. बैठकीत लोकसभा विसर्जित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

# एनडीएच्या नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड

नवी दिल्ली : २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला २४० जागा मिळाल्या असून एनडीएला २९२ जागांसह पूर्ण बहुमताने सत्ता राखण्यात यश आले आहे.

बुधवारी नवी दिल्ली येथे झालेल्या एनडीए घटक पक्षांच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आघाडीचे नेते म्हणून एकमताने सलग तिसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. शुक्रवारी (७ जून) सर्व एनडीए खासदारांची बैठक होणार आहे, त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यात येणार आहे. ८ जून रोजी मोदी पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. या शपथविधीनंतर नव्या मंत्रिमंडळाची स्थापना होणार आहे. आघाडीने संमत केलेल्या ठरावात स्पष्टपणे म्हटले आहे की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या लोककल्याणकारी धोरणांमुळे भारतातील १४० कोटी नागरिकांनी देशाचा प्रत्येक क्षेत्रात विकास होताना पाहिला आहे.



एनडीएच्या सर्व पक्षांनी मंजूर केलेल्या ठरावात पुढे असे म्हटले आहे की, ६ दशकांनंतर भारतातील जनतेने एका मजबूत नेतृत्वाला सलग तिसऱ्यांदा पूर्ण बहुमताने निवडून देण्याची किमया केली आहे. एनडीएच्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक केवळ लढवली नाही तर ती जिंकल्याचा अभिमानही व्यक्त केला. तसेच, मोदींची पुन्हा एकदा एकमताने नेतेपदी निवड करण्यात आली. गरीब, महिला, तरुण, शेतकरी, शोषित, वंचित आणि पीडित नागरिकांच्या सेवेसाठी वचनबद्ध असल्याचे एकमताने सांगण्यात आले. या बैठकीत जेडीयूप्रमुख नितीशकुमार, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल आणि इतर नेते सहभागी झाले होते.

# भाजपच्या पराभवाची जबाबदारी मी स्वीकारतो : देवेंद्र फडणवीस




मुंबई : लोकसभेच्या निवडणुकीत राज्यात भाजप आणि महायुतीला मिळालेल्या कमी जागांची जबाबदारी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्वीकारली आहे. भाजपच्या पराभवाची जबाबदारी मी स्वीकारतो, यापुढे आता पक्ष संघटनेच्या कामाकडे लक्ष द्यायचं आहे, त्यामुळे आपल्याला उपमुख्यमंत्रिपदावरून मुक्त करावं अशी विनंती देवेंद्र फडणवीसांनी केंद्रीय नेतृत्वाला केली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या पत्रकार परिषदेनंतर आता भाजपसह महायुतीमध्येही खळबळ उडाल्याचं दिसतंय.

लोकसभेच्या निकालानंतर आता राज्यात राजकीय भूकंपाला सुरूवात झाल्याचं दिसतंय. त्याची सुरूवात भाजपमधून झाली आहे. महायुतीमध्ये स्थानिक पातळीवर काही ठिकाणी समन्वय नसल्याचा फटका आपल्याला बसल्याचं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. तसेच विरोधकांनी संविधान बदलण्याचं खोटं नॅरेटिव्ह तयार केलं आणि त्याचा फटका महायुतीला बसल्याचा दावा त्यांनी केला. सरकारमधून मोकळं करण्याची विनंती उपमुख्यमंत्री । पान २ वर

## राज्यात शनिवारपासून जोरदार पावसाचा इशारा

पुणे/प्रतिनिधी : मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती आहे. बुधवारी (५ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होणे अपेक्षित होते. पण, प्रत्यक्षात मोसमी पाऊस गोव्यातच अडखळला आहे. गुरुवारी( ६ जून) तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवारपासून (८ जून) पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पाऊस मंगळवारी (४ जून) गोव्यात । पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१ वा शिवराज्याभिषेक सोहळा

रायगड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त आज ६ जून रोजी रायगडावर मोठ्या दिमाखात शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमले आहे. शिवभक्तांमध्ये मोठं उत्साहाचं वातावरण असून पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी लोककलांचे सादरीकरण आणि पोवाडे यामुळे रायगडावरील वातावरण शिवमय झालं असल्याचं पाहायला मिळत आहे.



किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामधून मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून काही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिसांचा बंदोबस्तही तैनात करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर राज्यातील विविध नेते मंडळीही रायगडावर येण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने । पान २ वर

# आता शिंदे-फडणवीस सरकारचा भ्रष्टाचार जनतेसमोर मांडणार, काँग्रेसची विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू

मुंबई : राज्यात लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होत आहेत. महाविकास आघाडीला राज्यात मिळत असलेल्या जागांबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. लोकसभेतील विजयाचं श्रेय पटोले यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींना दिलं आहे. नाना पटोले म्हणाले, मोदींच्या सरकारविरोधात ही जनतेची लढाई होती. या लढाईला राहुल गांधी यांनी वाचा फोडली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर, भारत जोडो यात्रा आणि मणिपूर ते मुंबई अशी न्याय यात्रा काढली आणि जनतेने जो प्रतिसाद राहुल गांधींच्या यात्रेला दिला, हे त्याचं फलित आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करताना नाना पटोले म्हणाले, देशामध्ये परिवर्तन होऊ शकत नाही, नरेंद्र मोदींशिवाय दुसरा कोणी नेता होऊ शकत नाही. अशा पद्धतीचं वारंवार गोदी मीडियाच्या माध्यमातून, सोशल मीडियाच्या माध्यमातून जे पेरलं जात होतं, त्याला जनतेनं उत्तर दिलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामध्ये लोकशाहीत प्रत्येकाला एक मताचा जो अधिकारी दिला आहे. त्या मताच्या तलवारीनं सत्तेमध्ये ज्यानी गर्व केला असे सत्ताधीश जे होते, त्यांना सत्तेच्या बाहेर करण्याचं काम या देशातल्या जनतेनं केलं आहे. माझ्यापेक्षा कोणी मोठा नाही, मीच या देशाचा सर्वेसर्वा, देश विकला तरी चालेल अशी जी भावना होती तिला जनतेनं संविधानात दिलेल्या मताच्या तलवारीनं सत्तेबाहेर काढलं आहे. जनतेला मताचा



अधिकार आहे. या देशामध्ये जनतेपेक्षा कोणी मोठा नाही हे पुन्हा या लोकशाहीनं समजावून सांगितलं आहे.

नाना पटोले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रानी, शाहु फुलेंच्या महाराष्ट्रानी चमत्कार केला आहे. महाराष्ट्राच्या असंविधानिक सरकारला एक सबक दिलेला आहे. महाराष्ट्रामध्ये असंविधानिक व्यवस्था, खोक्यांची व्यवस्था कधीही चालू शकत नाही. शाहू, । पान २ वर

# जिल्हा प्रशासनाने सूक्ष्मपणे नियोजन करून लोकशाहीचा उत्सव थाटात साजरा केला

## मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी तसेच पत्रकार यांच्याकडून प्रशासनाच्या कामाचे कौतुक

सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आणि संपूर्ण देशभरात लोकशाहीच्या उत्सवात सुरुवात झाली. सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली तो दोन्हीही मतदार संघात मतदानाच्या टक्केवारी थोडीशी वाढ झाली. तर ४ जून रोजी संपूर्ण देशभरासह सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणीची प्रक्रिया निर्विघ्न होऊन जिल्ह्यातील मतदारांनी लोकशाहीचा उत्सव अत्यंत थाटात साजरा केला. यासाठी जिल्हा प्रशासनाने अत्यंत सूक्ष्म नियोजन करून शांततामय व भयमुक्त वातावरणात संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडली.

जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून ते मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रत्येक गोष्टीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवले होते. अप्पर जिल्हाधिकारी तथा माढा लोका लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह ठाकूर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निरहाळी, सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व नोडल अधिकारी- कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे ततोतंत पालन करून लोकशाहीचा उत्सव यशस्वीपणें साजरा होण्यास साठी सक्रिय सहभाग नोंदविला.

हा लोकशाहीचा राष्ट्रीय उत्सव साजरा करताना मतमोजणीसाठी असणारे कर्मचारी,अधिकारी ,उमेदवारांचे प्रतिनिधी, उमेदवार, पत्रकार आदींना निवडणूक पार पडताना आतापर्यंत देण्यात आलेल्या नव्हत्या एवढ्या चांगल्या सेवा सुविधा सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या. विशेष म्हणजे या सुविधेमुळे सोलापूर जिल्ह्यातील माढा, सोलापूर लोकसभेची मतमोजणी प्रक्रिया सहज, सुलभ आणि सुकरपणे पार पडली. सोलापूर व माढा या दोन मतदारसंघासाठी सोलापुरातील रामवाडी गोदामामध्ये मतमोजणी प्रक्रिया संपन्न झाली. या गोदाम परिसराला एका खूप मोठ्या राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त झालेले होते.

**⁕वाहन पार्किंग व्यवस्था :** मतमोजणी परिसरात वाहनांची गर्दी टाळण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी, उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधीसाठी केंद्रीय विद्यालय येथे वाहनतळाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

**⁕वातानुकुलीत कक्षामध्ये मतमोजणी :** मतदान यंत्र आणि मतमोजणी प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण, अडथळे आणि समस्या येऊन याकरिता सर्व मतमोजणी कक्ष वातानुकूलित



करण्यात आले होते. या कक्षामध्ये मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांना बसण्यासाठी सुसज्ज व्यवस्था करण्यात आली होती. कक्षांमधील उपस्थितांसाठी पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

**⁕मंडप आणि आधुनिक सुविधांची व्यवस्था :** जिल्ह्यात होणाऱ्या मान्सूनपूर्व वादळी वाऱ्यासह होणाऱ्या पावसाची शक्यतेबाबत दूरदृष्टी ठेवून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संपूर्ण गोदामाच्या परिसरात वॉटरप्रूफ शामियाना उभा करून घेतला होता. ऐन मतमोजणी प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यात पाऊस सुरू झाल्यावरही कुठल्याही प्रकारची तारांबळ उडाली नाही. गोदामाच्या आतील परिसरात चिखल झाला नाही. ईव्हीएम मशीन असलेल्या पेट्या घेऊन जाताना कर्मचाऱ्यांना पावसाचा कोणताही अडथळा आला नाही. त्यामुळे मतमोजणीस ही पावसाचा आडथळा आला नाही उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी देखील सायंकाळी आल्यावर भर पावसात त्यांना निवारा मिळाला. मतमोजणी कक्ष व परिसरात अनुचित प्रकार घडू नये साठी खबरदारी म्हणून प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले होते. कंट्रोल रूममधून संपूर्ण परिसरावर नियंत्रण ठेवण्यात येत होते.

**⁕स्वच्छतेची विशेष सोय :** महिला व पुरुषासांठी तात्पुरते स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच दोन फिरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आली होती. गोदामाचा सर्व परिसर स्वच्छ करण्यात आलेला होता. स्वच्छतेसाठी सोलापूर महापालिकेचे सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले होते.

**⁕प्राथमिक आरोग्य आणि भोजनाची सुविधा :** मतमोजणी परिसरात एखादी आरोग्याची समस्या उद्भवली तर त्यावेळेस त्याच्यावर ताबडतोब प्राथमिक उपचार करण्याकरता प्राथमिक उपचार किट तसेच म्बुलन्सची व्यवस्था मतमोजणी परिसरात करण्यात आली होती. परिसरात चहा, । पान २ वर

## संपादकीय

### फलंदाजांना द्यावी...

फुटबॉल बेसबॉल आणि टेनिस यासारख्या व्यावसायिक खेळांसाठी प्रसिद्ध असलेल्या अमेरिकेमध्ये आता क्रिकेट रुजणार आहे. इंटरनॅशनल क्रिकेट काउन्सिल आयोजित टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला अमेरिकेमध्ये सुरुवात झाल्याने आता अमेरिकेमध्ये क्रिकेटची चर्चा होणार आहे. जगभरातील वीस देश या विश्वचषक स्पर्धेमध्ये भाग घेणार असल्याने आतापर्यंतची ही सर्वात मोठी विश्वचषक स्पर्धाही ठरणार आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडीज यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार असली तरी त्यामध्ये अमेरिकेचा वाटा मोठा आहे. या निमित्ताने अमेरिकेसारख्या मोठ्या देशामध्ये क्रिकेटचे वातावरण तयार होणार आहेच, शिवाय ज्या देशांमध्ये अद्याप क्रिकेट लोकप्रिय झालेले नाही त्या देशांनासुध्दा आंतरराष्ट्री पातळीवरील संघांसोबत खेळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेतील काही संघांवर नजर टाकली तर पहिल्यांदाच क्रिकेटच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेमध्ये हे देश सहभागी होणार आहेत. काही ठरावीक देशांमध्ये लोकप्रिय असलेला क्रिकेटचा खेळ जगाच्या कानाकोपऱ्यातही पोहोचवण्याचे उद्दिष्ट या निमित्ताने सिध्द होऊ शकेल. भारतासाठी विचार करायचा झाल्यास यावेळी तरी भारत विश्वचषक स्पर्धा जिंकणार आहे की नाही हीच एक शंका प्रत्येकाच्या मनात आहे. भारतीय क्रिकेट संघाला गेल्या तेरा वर्षांपासून आयसीसी पुरस्कृत कोणत्याही विश्वचषक स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळवता आलेले नाही. गेल्या काही वर्षांच्या कालावधीत झालेल्या कोणत्याही विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम किंवा उपान्त्य फेरीपर्यंत धडक मारलेल्या भारताला विश्वचषकावर मात्र नाव कोरता आलेले नाही. गेल्या वर्षी भारतात झालेल्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतही अंतिम फेरीपर्यंत अपराजित राहिलेल्या भारताला अंतिम फेरीमध्ये मात्र ऑस्ट्रेलियाकडून हार पत्करावी लागली होती आणि पुन्हा एकदा विश्वचषकापासून वंचित राहावे लागले होते. साहजिकच अमेरिकेत होणाऱ्या या विश्वचषक स्पर्धेमध्ये तरी भारत विजेता ठरणार की नाही याची उत्सुकता सर्वांना आहे. नेहमीप्रमाणेच क्रिकेट तज्ज्ञांनी यावेळी पुन्हा एकदा फेव्हरेट संघाच्या यादीमध्ये भारताचा समावेश केला आहे. या तज्ज्ञांची ही अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी भारतीय संघाला पार पाडावी लागणार आहे. कित्येक वर्षांपासून भारतीय क्रिकेटचा अविभाज्य भाग असलेले विराट कोहली आणि रोहित शर्मा या फलंदाजांची ही शेवटची विश्वचषक स्पर्धा असणार आहे. या स्पर्धेमध्ये देदीप्यमान कामगिरी करून भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून ती भेट या दोन महान फलंदाजांना द्यावी.



# आपल्या आहारामध्ये लिंबू समाविष्ट करा

लिंबाला आहारशास्त्रामध्ये 'सुपर फूड'चा दर्जा देण्यात आला आहे. आपल्या आवडत्या खाद्य पदार्थांची चव वाढविण्यास लिंबू सहायक आहेच, पण त्या शिवाय ह्याचे सेवन आरोग्याला अतिशय फायदेकारकही आहे. लिंबाच्या रसामध्ये असणारे फ्लावेनॉइड्स अँटी ऑक्सिडंट्स ने युक्त असून, ह्या रसाच्या सेवनामुळे अनेक आजारांपासून शरीराला संरक्षण मिळते. लिंबाचा रस हा 'ॲसिडीक' असाल, तरी अल्कलीचे उत्तम स्रोत आहे, ज्यामुळे शरीराची 'हि' लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते.

लिंबामध्ये कर्करोग प्रतिरोधक तत्वे आहेत. ह्या तत्वांना सिट्रस लिमीनॉइड्स म्हटले जाते. ह्या तत्वांमुळे शरीरातील सामान्य कोशिकांचे कर्करोगबाधित कोशिकांमध्ये परिवर्तन होण्याला आळा बसतो. तसेच पचनशक्ती उत्तम राखण्याकरिता देखील लिंबू सहायक आहे. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर चहा किंवा कॉफीच्या सेवना ऐवजी कोमट पाण्यामध्ये लिंबाचा रस घालून त्याचे सेवन करावे. त्यामुळे शरीराला क जीवनसत्व मिळते, व पचनतंत्रदेखील सुरळीत चालू राहते. परिणामी, शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते.जर सर्दी-खोकल्यामुळे किंवा तत्सम इन्फेक्शनमुळे घसा दुखत असेल तर कोमट पाण्यामध्ये मधाबरोबर लिंबाचा रस घ्यावा. त्याने घशातील इन्फेक्शन कमी होऊन घसादुखीमध्ये आराम पडतो. लिंबाचा रस दररोज सेवन केल्याने शरीरामध्ये सायट्रेट लेव्हल वाढतात. त्यामुळे किडनीमध्ये कॅल्शियम डीपॉझिट झाल्याने होणारे किडनी स्टोन होण्यास आळा बसतो. तसेच लिंबाच्या रसामध्ये पेक्टिन नामक तत्व वजन घटविण्यास सहायक आहे. पेक्टिन हे सोल्युबल फायबर वजन घटविण्यास सहायक असते.अनेकदा डास चावल्यामुळे किंवा कुठला किडा चावल्याने शरीरावर लहान फोड येतात, आणि त्याठिकाणी सतत खाज सुटू लागते. अशावेळी त्या जागी लिंबाचा रस लावल्याने खाज कमी होते. जिथे खाज सुटत असेल, तिथे लिंबाचा रस लावावा, व रस वाळल्यानंतर धुवून टाकावा. ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल त्यांनी अलाशीच्या बियांमध्ये ( जवसामध्ये ) लिंबाचा रस घालून त्याचे सेवन करावे. याने बद्धकोष्ठाचा त्रास दूर होण्यास मदत मिळेल.

# तुमच्या जेवणाच्या प्लेटचा रंग आणि वजनाचा थेट संबंध

आपल्या वजनाचा संबंध अनेक गोष्टींशी आहे. आपला आहार, आपण करीत असलेला व्यायाम, आपली जीवनशैली, अश्या अनेक गोष्टींशी असतो हे आपणा सर्वांनाच ठाऊक आहे. मानसिक तणाव, अपुरी झोप, ह्या गोष्टींचा देखील आपल्या वजनावर परिणाम होत असतो. पण या गोष्टींच्या व्यतिरिक्त तुम्ही तुमचे जेवण ज्या रंगाच्या प्लेट मधुन घेता, त्या रंगाचा देखील तुमच्या वजनावर परिणाम होत असतो हे तुम्हाला कदाचित ठाऊक नसेल. पण अलीकडेच झालेल्या एका रीसर्च मध्ये तज्ञांनी हे निदान केले आहे.ह्या रीसर्चनुसार तुम्ही ज्या रंगाच्या प्लेटमधून जेवता, त्या रंगाचा थेट संबंध तुमचे वजन नियंत्रित करण्याशी आहे असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. म्हणूनच आपण ज्या प्लेटमध्ये जेवतो त्या प्लेटचा रंग विचारात घेणे आवश्यक आहे. आधी आपल्याकडे केवळ स्टीलच्या प्लेट्स प्रामुख्याने वापरल्या जात असत. पण आता मेलामाईन, काच, ब्लू पॉटरी, चायना ग्लास अश्या अनेक तऱ्हेच्या प्लेट्स आपल्याकडे सर्रास वापरल्या जाऊ लागल्या आहेत. ह्या प्लेट्स अनेक निरनिराळ्या आकर्षक रंगांमध्ये बनविल्या जातात. त्यामुळे प्लेट्स निवडताना त्यांचा केवळ रंग चांगला दिसतो म्हणून न निवडता, यांचा संबंध आपल्या वजनाशी आहे हे लक्षात घेऊन रंग निवडावा.



ह्या रीसर्चनुसार, हलक्या रंगांच्या प्लेटमध्ये जेवण घेताना आपण आपल्या क्षमतेपेक्षा जास्त अन्न सेवन करतो, तर गडद रंगांच्या प्लेटमध्ये जेवण घेतल्याने जेवणाची मात्रा आपोआपच नियंत्रित राहत असल्याचे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. गडद रंगांच्या प्लेटमध्ये जेवल्याने भूक लवकर शमते असे वैज्ञानिक म्हणतात, आणि भूक लवकर शमल्याने आपोआपच कमी जेवले जाते, म्हणून वजन आटोक्यात ठेवायलाही मदत होत असल्याचे निदान वैज्ञानिकांनी केले आहे. गडद रंग आपल्या मेंदूला शांत करणारे, संतुष्टीची भावना देणारे आहेत, म्हणूनच या रंगांच्या प्लेटमधून जेवल्याने भूक लवकर शमल्याची भावना होते.

वैज्ञानिकांच्या मते, गडद रंगांमध्ये निळ्या रंगाच्या प्लेट्स सर्वोत्तम समजल्या गेल्या आहेत. त्यामुळे ज्यांना आपल्या वजनावर नियंत्रण मिळवायचे असेल, त्यांनी मध्यम आकाराच्या निळ्या रंगाच्या प्लेटमध्ये जेवण घ्यावे असा सल्ला वैज्ञानिक देतात. तसेच ही प्लेट प्लास्टिक ची न असता सिरॅमिकची असावी.

# जीवनशैलीतील 'या' बदलांमुळे तुम्ही निरोगी दीर्घायुषी व्हाल!

रात्री झोपण्यापूर्वी अनेकजण सकाळी लवकर उठून व्यायाम करण्याचा विचार करतात. मात्र सकाळी लवकर उठणे शक्य होत नाही. आपल्या धकाधकीच्या आणि गुंतागुंतीच्या जीवनशैलीचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे या धावपळीतून स्वतःसाठी वेळ काढणे गरजेचे आहे. तर आपल्या जीवनशैलीत काही लहान सहान बदल केल्यास तुम्हाला निरोगी दीर्घायुष लाभेल. पाहूया काय आहेत ते बदल...

**शारीरिक हालचाली बंद करु नका**वाढत्या वयानुसार अवयवांचे काम करणे काहीसे मंदावते. पण तुम्ही थांबू नका. हालचाल, काम करणे बंद करु नका. जिने चढा. चाला, फिरा. असा काहीना काहीतरी शारीरिक हालचाली चालू राहू द्या. त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होईल. **वजन नियंत्रित ठेवा**सात्विक, संतुलित आहार घ्या. त्यामुळे वजन गरजेपेक्षा अधिक वाढणार नाही. आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे यांचा समावेश करा. मांसाहारी पदार्थ तुम्हाला आवडत असतील तर जरूर खा. पण त्याचा अतिरेक टाळा. त्याचबरोबर दूध, अंडी अवश्य खा. त्यामुळे शरीराला प्रोटीन्स भरपूर प्रमाणात मिळतील. अशा संतुलित आहाराने शरीराचे वजन नियंत्रित राहिल.**आनंदी रहा** घरी किंवा ऑफिसमध्ये नेहमी गंभीर राहणे गरजेचे नाही. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत, मित्रमंडळींसोबत हसत खेळत राहू शकता. त्यामुळे तुमचे शरीर-मन रिलॉक्स होईल. थकवा दूर होईल आणि तुम्ही प्रसन्न रहाल.**भावना शेअर करा** भावभावना, अनुभव शेअर केल्याने मन मोकळे होते. भावना, विचारांचे आदान प्रदान झाल्याने नवीन काही शिकायला मिळते.

पान १ वरुन

### जिल्हा प्रशासनाने सूक्ष्मपणे नियोजन..

अल्पोहार आणि भोजन व्यवस्था ठेवण्यात आली होती. त्यामुळे कुठलाही प्रकारचा तणाव हा कर्मचारी अधिकारी आणि निवडणूक उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींवर आला नाही. या संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेसाठी बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांना देखील एअर कुलर च्या माध्यमातून त्यांच्या कर्तव्यावर असताना त्यांच्या तब्येतीची काळजी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. सोलापूर मनपाच्या स्वच्छता विभागाकडून सातत्याने परिसराची स्वच्छता करण्यात येत होते.

***पोलीस सुरक्षा व्यवस्था :** मतमोजणी ही शांततेत व सुरळीत पार पडावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण सुरक्षा व्यवस्था, आग प्रतिबंधक सुविधा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येक मतमोजणी कक्षात, पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप सुविधा देण्यात आली होती. मतमोजणी कक्ष आणि परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. चोख सुरक्षा व्यवस्थेमध्ये मतमोजणी निर्विघ्नपणे पार पडले.

***मतमोजणी केंद्रावर राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती :** मतमोजणी कामाकरिता राखीव अधिकारी आणि कर्मचार्यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्ट्रांग रूममधून मतमोजणी कक्षामध्ये मतदान यंत्र पोहोचविण्यासाठी कलर कोडींग केलेले कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलीये होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मतदान यंत्र नेण्यात येत होते.

***मिडिया सेंटर :** अधिकारी कर्मचारी यांच्यासोबत पत्रकारांसाठी देखील पत्रकार कक्ष उभा करण्यात आले होते. या कक्षामध्ये चहा, शुद्ध पाणी आणि भोजनाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. वातानुकूलित संपूर्ण कक्ष तयार करण्यात आला होता. या पत्रकार कक्षामध्ये दूरचित्रवाणी, इंटरनेट सुविधा, झेरॉक्स, संगणक, प्रिंटर अशा सर्व सुविधा पत्रकारांना पुरवण्यात आल्या. तसेच माढा व सोलापूर लोकसभा मतदार संघातील फेरी निहाय येणारी आकडेवारी व्हाट्सअप ग्रुपवर पाठविण्याबरोबरच त्याची फेरी निहाय प्रत्येक प्रत पत्रकारांना देण्यात येत होती.त्यामुळे पत्रकारांना अचूक आणि वेळेवर वार्तांकन करण्यासाठी मदत झाली.

अशा उत्कृष्ट सुविधामुळे संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया उत्तमरित्या संपन्न झाली. याबाबत पत्रकारांनी कर्मचाऱ्यांनी आणि उमेदवाराच्या प्रतिनिधी देखील समाधान व्यक्त केले. सेवा सुविधा अधिक पुरवल्या की प्रत्येकाला काम करण्याची ऊर्जा मिळते. या हेतूने जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून या उत्कृष्ट सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे मतमोजणी प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी सकाळी सहा वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संपूर्ण परिसराचा आढावा घेतला. आणि योग्य त्या सोयी सुविधा दिल्या जात आहेत का नाहीत याची स्वत:हून तपासणी केली. संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडल्यामुळे जिल्हा प्रशासनाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

### आता शिंदे-फडणवीस सरकारचा..

फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रानी हाच सबक सत्तेमध्ये बसलेल्यांना दिला आहे.

अग्नीवीर योजनेबाबत नाना पटोले म्हणाले, देशात आमचं सरकार आलं की आम्ही अग्नीवीर योजना बंद करू. त्या अग्नीवीर योजनेत पेन्शन नाही आणि शहिदाचा दर्जा पण नाही. त्यामुळे राजकीय व्यवस्थेत नेरंद्र मोदींनी अग्नीवीर योजना आणली होती. राहुल गांधींनी दिलेल्या वचनांची तुलना नेरंद्र मोदींच्या गॅरंटीशी होऊ शकत नाही. कारण मोदींची जुमलेबाजी होती.

जिथं तिथं भ्रष्टाचार! आता भ्रष्टाचाराचं सीरीज आम्ही या सरकारचं उघडणार आहे. आमच्या जवळ सगळे पेपर आहेत. अपडेट आहेत. माहितीच्या अधिकारात जोडलेली कागदं आहेत. शेतकऱ्यांच्या नावाने कसा भ्रष्टाचार केला, रस्त्यांच्या नावाने कसा भ्रष्टाचार केला, नदीचा कचरा काढण्यात भ्रष्टाचार केला. या सगळ्याची कागदोपत्री आमच्या जवळ आहे. भाजप व भाजपसोबतची लोकं एकत्रित का आली होती? राज्याची तिजोरी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदच्या तिजोऱ्या कशा लुटल्या, त्या सगळ्या कागदपत्रांसह आम्ही समोर येणार आहोत. आताचं राज्यातलं सरकार कसं भ्रष्टाचारी आहे. शेतकऱ्यांच्या टाळूवरचं लोणी कसं खातंय, तरुणांच्या टाळूवरचं लोणी कसं खातंय, हे सगळंच्या सगळं चित्र आम्ही लोकांसमोर आणणार आहोत.

### छत्रपती शिवाजी महाराजांचा

प्रशासनाने योग्य ती तयारीही केली आहे.किल्ले रायगडावर शिवभक्तांची गर्दी होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सज्ज असून काही स्वयंसेवक देखील मदतीसाठी असणार आहेत. तसेच आपत्कालीन उपचारांसाठी वैद्यकीय उपचार केंद्रही सुरु करण्यात आलेली आहेत. याबरोबरच पोलीस प्रशासनाच्यावतीने खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. किल्ले रायगडावर शिवभक्तांची गर्दी होण्याची शक्यता पाहता गाड्यांच्या पार्किंगसह पिण्याच्या पाण्यासह योग्य त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५१ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त किल्ले रायगडावर मोठ्या उत्साहात सोहळा पार पडत आहे. याचबरोबर महाराष्ट्रात विविध ठिकाणीही शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जात आहे. तसेच राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलेलं आहे. तसेच कोल्हापुरात देखील नवीन राजवाड्यात शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. कोल्हापूर येथील शिवराज्याभिषेक सोहळ्यात खासदार शाहू महाराज छत्रपती आणि संभाजीराजे छत्रपती सहभागी झाले आहेत.

### भाजपच्या पराभवाची जबाबदारी

देवेंद्र फडणवीस यांनी पक्ष नेतृत्वाकडे केली आहे. पराभवाची संपूर्ण जबाबदारी आपली असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. पक्षासाठी काम करण्यासाठी सरकारमधून मोकळं होण्याची इच्छा त्यांनी व्यक्त दाखवली.

भाजपच्या कार्यकर्त्यांनी उत्तम काम केलेलं आहे. मुंबईच्या अध्यक्षांनी स्वतः लक्ष घातलं. जो पराभव झाला त्याची सर्व जबाबदारी माझी आहे. सर्व जबाबदारी देवेंद्र फडणवीस स्वीकारत आहे. आता मला विधानसभेसाठी पूर्ण उतरायचं आहे. मला सरकारमधून मोकळ करावं, अशी मी विंनती करणार आहे. बाहेर राहिलो तरी मी काम करीन. पण मला आता पूर्णवेळ विधानसभेकडे लक्ष केंद्रीत करायचं आहे.महाराष्ट्रामध्ये महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. अपेक्षेपेक्षा खूप कमी जागा मिळाल्या. महाराष्ट्रात आमची लढाई महाविकास आघाडीसोबत होतीच, त्यासोबतच नरेटिव्हसोबत करावी लागली. त्यामध्ये संविधान बदलणार असा नेरेटिव्ह तयार करण्यात आला. हा नेरेटिव्ह आम्हाला थांबवता आला नाही. त्याला आम्ही उत्तर देऊ शकलो नाही, त्याचा आम्हाला फटका बसला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

काल लोकसभा निवडणुकांचे निकाल आले. मी देशभरातील भाजपच्या कार्यकर्त्यांचा आभार मानतो. पंडित नेहरूंच्या नंतर पुन्हा एकदा जनतेने तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याचा मोदींना आशीर्वाद दिला. पहिल्यांदा ओरिसामध्ये पहिल्यांदा भाजप नेतृत्वात सरकार बनणार आहे. भाजप आणि एनडीए घटक पक्ष मिळून सरकार बनणार. राज्यात अपेक्षित यश मिळालेले नाही. आम्हाला खूप कमी जागा मिळालेल्या आहेत. महाविकास आघाडिला राज्यात २ लाख मते आमच्या पेक्षा जास्त मिळाली. मुंबईत दोन लाख मतं आम्हाला जास्त मिळालेली आहेत. काही जागा आम्ही २००० हजार पेक्षा कमी मतानी हरलो. ही निवडणूक घासून झाली. पण भाजपला राज्यात लोकांनी नाकारले अशी परिस्थिती नाही. सम समान मते मिळाली आहेत.

आज आम्ही बसून निवडणुकीचा आढावा घेतला आहे. याबाबत आम्ही दिवसभर बैठक घेऊ. निवडणुकीत कोणते मुद्दे होते याचा आम्ही विचार केला. काही ठिकाणी ॲटिइंकबन्सी दिसली. भाजपच्या कार्यकर्त्यांनी उत्तम काम केलेले आहे. मुंबईच्या अध्यक्षाने स्वतः लक्ष घातले. मी दोन्ही उमेदवारांचे अभिनंदन करतो. जो पराभव झाला त्याची सर्व जबाबदारी माझी आहे. सर्व जबाबदारी देवेंद्र फडणवीस स्वीकारत आहे. आता मला विधानसभेसाठी पूर्ण उतरायचा आहे. मला सरकारमधून मोकळ करावे अशी मी विंनती करणार आहे. बाहेर राहिलो तरी मी पक्षासाठी काम करेन.

काही ठिकाणी कांदा आणि सोयाबिनचा प्रश्न होता, कापसाचाही प्रश्न होत. त्यामुळे काही ठिकाणी सरकारविरोधात ॲटिइन्कम्बन्सी होती. जनतेने दिलेले जनादेश माणून आम्ही पुढील तयारी करण्याचा निर्णय घेतला. ज्यांना जास्त जागा मिळाल्या. त्यांचं अभिनंदन करतो.

### राज्यात शनिवारपासून ..

दाखल झाला होता. मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे बुधवारी (५ मे) तळकोकणात पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. प्रत्यक्षात पाऊस गोव्यातच अडखळला आहे. सिंधुदुर्गमध्ये बुधवारी ढगाळ वातावरण तयार झाले होते. तापमानात घटही झाली आहे. सिंधुदुर्गमध्ये काही ठिकाणी हलका पाऊसही झाला. पण, तो पूर्वमोसमी होता. गुरुवारी (६ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

हवामान विभागाने शनिवारी (८ जून) आणि रविवारी (९ जून) रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.सोमवारपर्यंत (१० जून) मोसमी पाऊस विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता राज्यभरात दाखल होईल. रविवार, सोमवार आणि मंगळवारी मुंबईसह किनारपट्टी आणि पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून १५ लाख ९१ हजार किंमतीचे दोन सोन्याचे हार अर्पण



पंढरपूर/प्रतिनिधी : मौजे कुंजीरवाडी, (ता. हवेली) येथील भाविक बबन रामचंद्र तुपे यांनी श्री विठ्ठलास चार पदरी व श्री रुक्मिणी मातेस पाच पदरी असे दोन सोन्याचे हार अर्पण केले आहेत.

हाराचे एकूण वजन २४९ ग्रॅम असून त्याची किंमत१५ लाख ९१ हजार ११० इतकी आहे.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने श्री तुपे यांचा सत्कार मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी उपस्थित होते.

# स्वेरीमध्ये ‘आहार क्रांती’ या विषयावर चर्चासत्र संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एमबीए विभागामध्ये ग्लोबल इंडीयन सायंटिस्ट अँड टेक्नोक्रॅट्स (जीआयएसटी) तर्फे 'आहार क्रांती' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रातून दैनंदिन आहाराबाबतच्या महत्वाच्या बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व एम.बी.ए.चे विभागप्रमुख डॉ. के.पी. गलानी यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या चर्चासत्रात मान्यवरांनी 'आहार क्रांती'चे महत्व विशद केले. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पृथ्वी विज्ञान मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी पोषणाविषयी जनजागृती करण्यासाठी आणि भारतातील आर्थिकदृष्ट्या सुलभ, स्थानिक असलेली सकस फळे आणि पाले-भाज्यांचे महत्त्व समजून घेण्यासाठी देशभर एक मिशन 'आहार क्रांती' हा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये पौष्टिक आहाराच्या सवयींमध्ये बदल घडवून आणण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी हा 'आहार क्रांती' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. पोषण आहाराबाबत जागृतीच्या क्षेत्रातील हा एक महत्वाचा टप्पा आहे. जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.



कार्यक्रमाचे समन्वयक व संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने यांनी आपल्या भाषणातून आहार क्रांती विषयक माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ.एस.एस.वांगीकर यांनी आहार क्रांतीचे महत्व स्पष्ट केले. आहार क्रांती या उपक्रमातून पोषण क्षेत्रातील तज्ञ, उत्साही घटकांना एकत्र आणून खाण्याच्या निरोगी सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी विविध बाबींची चर्चा करण्यात आली. कार्यक्रमात संवादात्मक सत्रे, कार्यशाळा आणि प्रदर्शने होती, ज्यामुळे उपस्थितांना पोषण आणि निरोगीपणाबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी आणि व्यावहारिक ज्ञान मिळाले. चांगल्या आरोग्यासाठी पोषणाचे महत्त्व अधोरेखित करून आहार विषयक योग्य सवयींचा अवलंब करण्यावर जोर देण्यात आला. आहार क्रांती उपक्रमाला जसजशी गती मिळत आहे, तसतशी पोषण जागरूकता वाढीस लागत आहे. त्यातून व्यक्तींना खाण्याच्या योग्य सवयी आत्मसात करून सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रेरणा देण्यात आली. विभागप्रमुख डॉ. गलानी हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की 'चांगल्या आरोग्यासाठी संतुलित आहार गरजेचा असून आरोग्याच्या वाढीसाठी नियमित ताज्या पालेभाज्या आणि सकस आहार घेणे आवश्यक आहे.' प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना इंटरनल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ.एस.एस. वांगीकर यांनी आपल्या भाषणातून 'निरोगी राहणे हे आपले कर्तव्य आहे हा संदेश देवून 'आहार क्रांती' या उपक्रमाने समाजामध्ये पोषण आणि निरोगीपणासाठी जागरूकता आणि उत्साहाची नवीन भावना निर्माण झाली पाहिजे,' असे सांगितले तसेच विरुद्ध आहार टाळण्याचे आवाहन केले. या चर्चासत्रासाठी एम.बी.ए. विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकवर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अमाद अहमद यांनी केले तर प्रा.के.पी.कोंडुभैरी यांनी आभार मानले.

# उल्हासनगर महानगपालिका भाजी मार्केट मध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नागरिकांना कापडी पिशवीचे वाटप



**उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे**

दिनांक ५ जुन, २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख - अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख विशाखा सावंत तसेच त्यांचे सहकारी यांचेमार्फत उल्हासनगर महापालिकेच्या भाजी मार्केट क्र.५ येथे भाजी खरेदी करण्यासाठी येणा-या नागरीकांनी सिंगल युज प्लास्टीकच्या वापरास प्रतिबंध असल्याने प्लास्टीक पिशव्यांचा वापर करू नये याकरीता जनजागृती करण्यात येवून हरीत शपथ घेण्यात आली. तसेच नागरीकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले

# नीट परिक्षेत ७२० पैकी ६९१ गुण मिळवून निखिल वायाळचे घवघवीत यश

बुलढाणा/ राहुल साबळे



प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळेयाची प्रचिती अनेक जण आपल्या यशाच्या माध्यमातून आणून देत असतात. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी मोठी स्वप्न पाहा अन् ती पूर्ण करण्यासाठी स्वत:ला पूर्णपणे झोकून द्या, असे आपल्या भाषणांमधून वारंवार सांगत असे. शेतकऱ्यांच्या मुलाने नीटच्या परीक्षेत यश मिळवले. विशेष म्हणजे हे यश पहिल्याच प्रयत्नात मिळवले.सिंदखेडराजा तालक्यातील बाळ समृद्र या छोट्या गावातील अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा निखिल विनोद वायाळ डॉक्टर होणार आहे. विशेष म्हणजे त्यांचे प्राथमिक शिक्षण मुळ गावी बाळ समृद्र येथील जिल्हा परिषद शाळेत झाले असताना माध्यमिक शिक्षण साखर खेर्डा येथील शाळेत झाले .असता आई वडील.अल्पभुधारक शेतकरी असताना सुध्दा निखिल पहिल्याच प्रयत्नात नीटच्या परीक्षेत उत्तीर्ण झाला. त्याचे वडील विनोद वायाळ शेतकरी आहे. .शेतीवर वायाळ कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

निखिल ने बारावी झाल्यानंतर त्याने नीटची तयारी सुरू केली. असता पहिल्यांदाच नीट ची परीक्षा दिली असता ७२० पैकी ६९१ गुण मिळवून निखिल ने यश संपादन केले आहे.अनेक स्तरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लोकसभा तो बस एक झाँकी हैं... अभी विधानसभा बाकी हैं : गणेश अंकुशराव

**पंढरपुर/प्रतिनिधी :** ''लोकसभा तो बस एक झाँकी है... अभी विधानसभा बाकी है.'' असे म्हणत आदिवासी कोळी जमातीच्या निर्णायक मतांमुळेच भाजपाचा दारुण पराभव झाला असून, येत्या विधानसभा निवडणुकीत याहून मोठ्या पराजयाला भाजपाला जावे लागेल! असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिलाय. आदिवासी कोळी जमातीच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करून न्याय देण्यासाठी वेळ मागुनही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमची जात बघून भेट नाकारली, त्याचाच रोष या निवडणुकीत आमच्या समाजाने दाखवून देत भाजपाला 'योग्य' जागा दाखवली आहे, असंही गणेश अंकुशराव म्हणाले.

सोलापूर जिल्ह्यातील सोलापुर व माढा लोकसभा मतदारसंघातील अनुक्रमे ९० ते १ लाख व १ लाख ते सव्वा लाख कोळी जमातीच्या लोकांचा देवेंद्र फडवणीस यांनी अपमान केला होता. भेटीसाठी कोळी व मराठा दोन समाजाचेच प्रतिनिधी रेस्ट हाऊस ला उपस्थित होते मराठा समाजाच्या १०० लोकांना भेटीसाठी आमंत्रित केले परंतु कोळी जमातीच्या दहा ते अकरा लोकांना भेट नाकारून अपमान केला होता. या अपमानाचा बदला लोकसभा निवडणुकीमध्ये कोळी जमातीच्या लोकांनी घेतला असल्याचं प्रतिपादन गणेश अंकुशराव यांनी केले आहे.



सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांचा काँग्रेसच्या प्रणिती ताई शिंदे यांनी पराभव केलाय तर माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचा महाविकास आघाडीचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी पराभव केलाय. या दोन्ही लोकसभा निवडणुकीत आदिवासी कोळी जमातीची मते ही निर्णायक ठरली आहेत. २०१४ च्या व २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत राज्यातील कोळी जमातीने भारतीय जनता पार्टीला पाठिंबा दिला होता ४५ ते ५० लाख महादेव, मल्हार , टोकरे, ढोर कोळी जमातीने भाजपाला भरभरून मतदान केल्याने सत्तेमध्ये आले होते. परंतु ज्या कोळी जमातीने देवेंद्र फडवणीस यांना मुख्यमंत्री केले त्या लोकांना देवेंद्र फडवणीस यांनी वार्यावरती सोडून दिले होते. वारंवार यासंदर्भात मीटिंग लावण्यासाठी विनंती करूनही एकही मिटींग घेतली नाही. राज्याच्या ३१ जिल्ह्यामध्ये गेली दहा वर्ष वेगवेगळ्या पद्धतीने कोळी जमातीचे लोक आंदोलन करत होते, उपोषण करत होते त्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील कोळी जमातीने जिल्ह्यातील दोन्हीही उमेदवारांचा पराभव करण्याचे ठरवले होते त्याचे परिणाम सोलापूर व माढा लोकसभा निवडणुकीच्या निकालावर झाल्याचे प्रकर्षाने दिसून येत आहे.

लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी केलेली चुक भाजपासह महायुतीला भोवली असुन येणार्या विधानसभा निवडणुकीपुर्वी तरी भाजपाने आमच्या समाजाचे प्रश्न सोडवावेत अन्यथा विधानसभेला आमच्या समाजाच्या प्रकर्ष विरोधाचा सामना भाजपा व महायुतीला करावा लागणार हे निश्चित असल्याचे मतही यावेळी गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले आहे. गेल्या कित्येक वर्षांपासुन महर्षी वाल्मिकी संघ या पंढरपुरातील सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव हे आदिवासी कोळी जमातीच्या विविध प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलनं करत स्वत:च्या समाजासाठी झगडत आहेत. आषाढी, कार्तिकी वारी काळात आलेल्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना यासंबंधीची निवेदनं देऊन शासनाचे आपल्या समाजाच्या प्रलंबित प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली असल्यानं आता त्यांनी दिलेल्या हा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे गांभीर्याने घेतील आणि आदिवासी कोळी जमातीचे प्रश्न सोडवतील अशी आशा या समाजाला लागली आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण चळवळ गतिमान करावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी




अक्कलकोट/प्रतिनिधी : कल्याणशेट्टी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात पर्यावरण संवर्धनाकडे कमालीचे दुर्लक्ष झाले आहे. वृक्ष लागवड चळवळ थंडावली आहे. ती गतिमान करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न केले पाहिजे. असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

हनूर रोडवरील महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण केले. त्यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्र सिंह लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्रा राज शेखर पवार उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, झाडे लावा झाडे जगवा ही संकल्पना मानव हिताची असून त्यामुळे शुद्ध हवा तसेच पावसाचे प्रमाण वाढणार आहे म्हणून प्रत्येकाने झाडे लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे तरच पर्यावरणाचे संतुलन आबाधित राहील.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, आभार प्रा राजशेखर यांनी मानले,

**वृक्ष संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत..**

सामाजिक संस्थांकडून कार्यक्रमाच्या निमित्ताने वृक्षारोपण केले जाते परंतु त्या वृक्षाचे संवर्धन करण्याची जबाबदारी देखील सामाजिक संस्थांनी घेतली पाहिजे. वृक्षाचे संवर्धन देखील केले पाहिजे असे यावेळी मार्गदर्शन करताना पूनम कोकळगी यांनी सांगितले.

**वृक्षारोपण उपक्रमाची कौतुक**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिंच उंबर पिंपळ करंजी वृक्षांचे रोपण केले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, मल्लिकार्जुन मसुती, रूपाली शहा, मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले. झाडे लावा व झाडे जगवा असा संदेश आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी दिला..

# पाताळेश्वर विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा



**निफाड/प्रतिनिधी** सिन्नर तालुक्यातील पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या आवारात,परिसरात जागतिक पर्यावरणाचे औचित्य साधून वृक्ष लागवड केली असून बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक .एस.बी.देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देतांना ते म्हणाले पर्यावरणाचे रक्षण करणे हे आपले पहिले कर्तव्य असून पर्यावरणातील सर्व घटक मानवासाठी उपयुक्त आहे. वनस्पती, पाणी,जमीन,हवा,यांचा उपयोग मानव आपल्या जीवनात करत असतो व आपल्या गरजा पूर्ण करतो आज पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे व आपणच पर्यावरणाचे संतुलन ढासाळण्यास कारणीभूत ठरत आहोत. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या पर्यावरणातील सर्व घटकांचे रक्षण करणे, संवर्धन करणे हि आपली जबाबदारी आहे.प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक झाड एक जीवन हि संकल्पना राबवावी वृक्ष संगोपन व जतन करणे ही काळाची गरज आहे असे ते म्हणाले

यावेळी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे शिक्षकटी.के .रेवगडे,बी.आर.चव्हाण, आर.व्ही.निकम,एस.एम.कोटकर ,आर.टी. गिरी ,एम.एम.शेख,सविता देशमुख,सी. बी.शिंदे,के.डी.गांगुर्डे, एस.डी.पाटोळे,आर. एस.ढोली,ए.बी. थोरे उपस्थित होते.

# वागदरी येथे इ.दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न




वागदरी/प्रतिनिधीः तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार येथील ग्रामपंचायत व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीच्या वतीने करण्यात आला. मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० बोर्ड परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन येथील ग्रामपंचायत व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीच्या वतीने करण्यात आले होते.या प्रसंगी सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर,उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव, ग्रामसेवक एम.एम.तांबोळी,ग्रा.प.सदस्या मिनाक्षी बिराजदार व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते इ.१० वी बोर्ड परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पहार पुष्पगुच्छ व शालेय साहित्य देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यानी केले. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक तथा सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीचे अध्यक्ष तथा सेवा निवृत्त पोलिस हवालदार संदिपान वाघमारे, माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, जेष्ठ कार्यकर्ते मोहनसिंग (दादा) चव्हाण, नागनाथ जाधव, सुदामा वचणे,महादेव बिराजदार,रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रामसिंग परिहार,बाळु पवार, बाळकृष्ण बिराजदार,दत्ता पाटील, चरणसिंग परिहार, ग्रामपंचायत कर्मचारी ओंकार चव्हाण,सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनाच्या काळातच मेरा अंत्रीखेडेकर कवठळ शिवारात अवैद्य वृक्षतोड; वनपाल साखर झोपेत

**बुलढाणा/ राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मौजे मेरा अंत्रीखेडेकर कवठळ शिवारात पर्यावरण दिनाच्या काळातच एक नवे दोन नवे तब्बल चार व्यापारी हे अवैद्य वृक्ष तोड करीत आहे याची भनक सुद्धा वनपाल यांना लागत नाही वनपाल हे या भागात नोकरी करतात की त्यांच्या ऑफिस व घरीच नोकरी करतात हा मोठा प्रश्न या भागातील वृक्षप्रेमी लोकांना पडलेला आहे वनपाल हे या भागांमध्ये कधीही दिसत नसल्यामुळे सदर व्यापारी यांची मुजुरी वाढली आहे आणि या तीन गावांमध्ये सुज्ञ नागरिकांच्या असे लक्षात आले आहे की जागतिक पर्यावरण काळामध्येच या भागांमध्ये चार ठिकाणी अवैध्य वृक्ष तोडत असल्याचे वृक्ष वर प्रेम करणाऱ्या लोकांनी या भागाचे वनपाल श्री पठाण यांना दूरध्वनीवरून सांगितले परंतु सर्व लोकांना चार ठिकाणी अवैध्य वृक्ष लागवड करताना दिसले परंतु या भागाच्या वनपाल अधिकारी यांना या भागातील अवैद्य वृक्ष लागवड तोडताना दिसले नाही हे विशेष उल्लेखनीय आहे वनपाल हे या भागांमध्ये येऊनही सुद्धा पाहत नाहीत भरपूर लोकांना या भागाचे वनपाल कोण आहे हे सुद्धा माहित नाही वनपाल हे फक्त कागदपत्रे विजिट करतात असे असल्याचे दिसून येत आहे या भागांमध्ये वन्य प्राणी सुद्धा पिण्याच्या पाण्यासाठी भटकतात काही दिवसापूर्वीच कवठळ या ठिकाणी एक माकड हे विहिरीत पडले होते त्यावेळेस सुद्धा या भागाचे वनपाल व जे अधिकारी ज्या अधिकाऱ्याची यासाठी निवड केली आहे त्यांनी सुद्धा या ठिकाणी येवुन सुद्धा पाहिले नाही त्यांनी एक प्रायव्हेट माणूस पाठवून माकड हे विहिरीतून बाहेर काढले सदर माकडाला हाताला व पायाला बऱ्याच जखमी झाल्या असल्याचे प्रथमदर्शनी स्थानिक लोकांनी सांगितले परंतु त्या ठिकाणी वन विभागाचे कोणतेही कर्मचारी हजर नसल्यामुळे सदर माकडावर कोणत्याही प्रकारचा इलाज न करताच माकड कळपामध्ये सोडून दिले वनविभागाचे कोणतेही कर्मचारी या भागांमध्ये येऊन सुद्धा पाहत नाही आज वन्यप्राणी हे पाण्यासाठी भटकत आहेत परंतु त्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही त्यामुळे काही वन्यप्राणी हे विहिरिमध्ये पडून जखमी होत आहे त्यावर कोणत्याही प्रकारचा वनविभागाचे कर्मचारी इलाज करत नाहीत व येऊन सुद्धा पाहत नाही त्यांच्यामार्फत कोणालातरी थोडेफार पैसे देऊन त्या त्यांची विल्हेवाट लावण्यास सांगतात परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची इलाज करण्यासाठी वन विभागाचे कोणतेच कर्मचारी त्रास घेत नाही वन कर्मचारी फक्त हे कागदपत्रे नोकरी करीत आहेत त्यांना दूरध्वनीवरून सांगितले असता ते उडवडीचे उत्तर देतात वन विभागाचे कर्मचारी फक्त ज्यावेळेस रोह्या पासूनचे नुकसान होते त्याच कामांमध्ये वनविभागाचे कर्मचारी तत्परता दाखवतात त्यामध्ये सुद्धा त्यांनी स्पेशल मध्ये एजंट नेमले आहेत त्यामध्ये ते अर्ध्यात तुम्ही आणि अर्ध्यात आम्ही अशी भूमिका वनविभागाची दिसून आली आहे

आज शासन वृक्ष लागवडीसाठी करोडो रुपये खर्च करीत आहेत आणि पर्यावरणाचा जो होणारा त्रास आहे तो वृक्ष तोडी मुळे होत आहे याची थोडीशी सुद्धा भनक वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना दिसून येत नाही ते फक्त आपल्या घरून फोनवर सांगतात की या भागांमध्ये वृक्षतोड ही होत नाही सर्व लोकांना वृक्ष तोडताना दिसतात परंतु वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना वृक्षतोड ही दिसत नाही का ज्यांच्यावर त्याची जबाबदारी दिली आहे तेच जर असे मूंग गळून गप्प बसले तर या भागातील जंगल थोड्या दिवसांमध्ये नष्ट होऊन वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही जर हे



जंगलतोड अशी सुरू राहिली तर याचा परिणाम माणसावर सुद्धा होणार आहे आज तपमान एवढं वाढला आहे त्याला कारणीभूत फक्त ही जंगल तोड आहे आणि प्राणी आणि वनस्पती जे प्राणी जंगलात राहतात ते आज गावामध्ये वास्तव्यात दिसून येत आहे याचा स्थानिक लोकांवर विपरीत परिणाम होत आहे जंगलतोडीमुळे जमिनीची धूप होऊन वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही सदर वृक्षतोडीची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच व्यापारी हे वृक्षतोड करीत आहे लोकांना सुद्धा वन खात्याचे कोणत्याही प्रकारची दाक राहीला नाही त्यामुळे कोणीही बिगर परमिशन हे झाडे तोडत आहे सदर झाडे तोडीचा माणसावर परिणाम झालेला आहे काही दिवसापूर्वीच माणसाला ऑक्सिजन कमी मिळाल्या मुळे कोरोना सारख्या महामारीने आपले डोके वर काढले होते त्यावेळेस ऑक्सिजनची गरज किती आहे हे सर्वसामान्य जनतेला कळाले आहे ऑक्सीजन देणे हेच कार्य झाडाच्या पानांमधून होते त्यामुळे वृक्ष तोड जर ही अशी चालू राहिली तर येणाऱ्या काळामध्ये या भागांमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासेल आणि येणारा पाऊस सुद्धा या भागामध्ये पडणार नाही कारण येणारे ढग जर सरळ समोर गैले तर या भागामध्ये पाऊस पडणार नाही आणि हा भाग वाळवंट होण्यास जास्त दिवस लागणार नाहीत तरी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी या विभागाचे वनपाल यांना समज देऊन आपले कर्तव्य काय आहे याची जाण करून द्यावी अशी मागणी सुद्धा या भागातील वृक्षप्रेमी लोक करीत आहे जर हे वृक्षतोड थांबली नाही तर थोड्याच दिवसांमध्ये वृक्षप्रेमी लोक आंदोलनाचा विचार करून सदर वनपाल यांना बडतर्फ करण्याची मागणी सुद्धा वन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा यांच्याकडे करणार असल्याची चर्चा या भागातील लोकांमधून दिसून येत आहे. सदर माहिती वन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा गवस मॅडम यांना दूरध्वनीवरून माहिती दिली असता त्यांनी ताबडतोब मोबाईल टिम यांना माहिती दिली व लवकरच झालेल्या अवैध वृक्षतोडीची चौकशी करण्यात येईल असे दूरध्वनीवरून उपवन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा गवस मॅडम यांनी सांगितले आहे

# प्रणिती शिंदे यांच्या विजयानंतर अक्कलकोटमध्ये जल्लोष

अक्कलकोट / शहर प्रतिनिधी : सोलापूर लोकसभा मतदार संघात कॉंग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे मोठ्या मताने विजयी झाल्या. तब्बल पाच भाजपाच्या आमदार असलेल्या लोकसभा मतदारसंघात एकहाती लढत देत आमदार प्रणिती शिंदे यांनी नियोजनबद्ध प्रचार करत विजयश्री खेचून आणली. भाजपाचा उमेदवारही जाहीर झाला नव्हता, त्यापूर्वीच प्रणिती शिंदे यांनी अक्कलकोट मतदार संघात प्रचाराला सुरूवात केली होती. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, शहराध्यक्ष रईस टिनवाला, युवा नेत्या शीतल म्हेत्रे, प्रथमेश म्हेत्रे यांच्या मदतीने अक्कलकोट विधानसभा मतदार संघ पिंजून काढला. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची ग्रामीण भागातील पकड व प्रणिती शिंदे यांच्या नियोजयच्या जोरावर तालुक्यातील ४७४२९ हजाराची लीड तोडत ती लीड फक्त दहा हजार मतापर्यंत आणून निर्विवाद वर्चस्व मिळविले. या मतदार संघातून भाजपाने गेल्या निवडणुकीसारखे तब्बल पन्नास हजारपेक्षा लीडची अपेक्षा ठेवली होती. पण भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी सर्व भाजपाचे पदाधिकारी यांना एकत्र करण्यात कमी पडले.

व अतिआत्मविश्र्वासामुळे व संपूर्ण लोकसभा मतदार संघ सांभाळावा लागल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना तालुक्यात म्हणावा तेवढा वेळ देता आला नाही. परिणामी तालुक्यातील लीड कमी झाली. लोकसभेची जरी निवडणूक असली तरी आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची विधानसभेची रंगीत तालीम होती. दुधनी, मैंदर्गी, चप्पळगांव, सलगर आदी भागात कॉंग्रेसने दमदार कामगिरी केली. तर अक्कलकोट शहरातील लीडही तोडण्यात यशस्वी झाले. निकालाचे वृत्त हाती येताच कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडुन, विजयाचा जल्लोष करत गुलाल उधळला. कॉंग्रेस शहराध्यक्ष रईस टिनवाला, मैनुद्दीन कोरबु, युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष मुबारक कोरबु, नगरसेवक सद्दाम शेरीकर, माजी विरोधी पक्षनेता शिवानंद बिराजदार यांच्यासह कार्यकर्ते वशीम कुरेशी, शहबाज यळसंगी, सकलेन बागवान, नुर शेख, शिवशरण इचगे, रमेश स्वामी, जब्बार बागवान, शाहरूख बागवान यांनी गुलाल उधळुन फटाके फोडून आंनदोत्सव साजरा केला.



# २७- मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील मतमोजणी प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसारच : निवडणूक निर्णय अधिकारी

मुंबई : २७- मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील मतमोजणी प्रक्रिया ही संपूर्णपणे भारत निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसारच पार पाडण्यात आल्याचे २७- मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी कळविले आहे.

विहित नियमांनुसार मतमोजणी प्रक्रिया

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार दि ४ जून २०२४ रोजी २७- मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघात टपाली मतपत्रिकांची मोजणी ही विहित वेळेत म्हणजे सकाळी ८ वाजता सुरु करण्यात आली. 'ईव्हीएम' मशीनवरील मतमोजणी साडेआठ वाजता सुरु करण्यात आली फेरीनिहाय मत मोजणीदरम्यान प्रत्येक फेरीत उमेदवारांना मिळालेली मते मतमोजणी टेबलवर फॉर्म क्रमांक १७ ग भाग २ मध्ये भरून त्यावर मतमोजणी प्रतिनिधींची स्वाक्षरी घेण्यात आली. संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेत कोणत्याही फेरीत मतमोजणी प्रतिनिधींकडून कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही. नियमाप्रमाणे प्रत्येक फेरीअखेर संबंधित फेरीत तसेच फेरीअखेर सर्व उमेदवारांना मिळालेली मते तसेच त्या फेरीअखेर आघाडीवर असलेल्या उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेमार्फत जाहीर करण्यात येत होती. यानुसार २५ व्या फेरीची मतमोजणी जाहीर होत असताना टपाली मतपत्रिकांची मतमोजणी संपली, त्यामुळे पंचविसाव्या फेरीची तसेच पंचविसाव्या फेरी अखेरची मतमोजणी जाहीर झाल्यानंतर टपाली मतपत्रिकांच्या फेरीचा निकाल जाहीर करण्यात आला. ज्यामध्ये उमेदवार अमोल कीर्तीकर यांना १५०१ तर उमेदवार रवींद्र वायकर यांना १५५० मते प्राप्त होती. नियमाप्रमाणे टपाली मतपत्रिकांची संख्या 'ईव्हीएम' मतमोजणीच्या सर्व फेऱ्यानंतरची ज्यात बेरीज केली जाते. त्यामुळे २६ व्या फेरीतील मतदान यंत्रांची मतमोजणी संपल्यानंतर २६ व्या फेरीतील २६ व्या फेरीअखेर मतदान यंत्रांच्या मतमोजणीमध्ये आघाडीवर असणाऱ्या तीन उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली. यात उमेदवार अमोल कीर्तीकर हे १ मतांनी आघाडीवर होते. नियमाप्रमाणे २६ व्या फेरीनंतर टपाली मतपत्रिकांची मतमोजणीची संख्या समाविष्ट करून उमेदवारनिहाय मते जाहीर करण्यात आली. ज्यामध्ये उमेदवार श्री.वायकर हे ४८ मतांनी आघाडीवर होते.

टपाली मतपत्रिका पुन:परीक्षण

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार मतमोजणी अखेर जर आघाडीच्या दोन उमेदवारांना मिळालेल्या मतांमधील फरक बाद टपाली मतपत्रिकांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:हून सर्व उमेदवारांच्या उपस्थितीत बाद टपाली मतपत्रिका पुन:परीक्षण करणे बंधनकारक असल्याने व २७- मुंबई उत्तर पश्चिम मतदार संघात बाद टपाली मतपत्रिकांची संख्या १११ इतकी असल्याने या सर्व बाद टपाली मतपत्रिकांचे पुनर्परीक्षण उमेदवारांच्या उपस्थितीत करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही करण्यात आले. तपासणीअंती टपाली मतपत्रिकांच्या मोजणी संख्येत काहीही फरक पडला नाही.

मुद्देसूद हरकत घेतलेली नव्हती

यानंतर दोन्ही केंद्रीय मतमोजणी निरीक्षकांनी आवश्यक असलेले प्राधिकार दिल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूकीचा निकाल तसेच विजयी उमेदवार ७.५३ वा जाहीर केला व श्री. कीर्तीकर यांच्या प्रतिनिधींनी ०८.०६ वाजता पुनर्मतमोजणीचे लेखी पत्र सादर केले. त्यांनी घेतलेली हरकत ही विहित मुदतीनंतर होती तसेच त्यांनी कोणतीही मुद्देसूद हरकत घेतलेली नव्हती तसेच संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया तसेच 'व्हीव्हीपॅट' मोजणी दरम्यान कोणतीही हरकत घेण्यात आली नव्हती असे २७- मुंबई उत्तर पश्चिमच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

# खासदार प्रणिती शिंदे यांची बसवारुढ मठास भेट मठाधिपतींचे घेतले आशीर्वाद, स्वामींनी दिले आशीर्वाद शुभेच्छा

सोलापूर/प्रतिनिधी : विमानतळ परिसरातील कस्तुरबा नगर येथील श्री श्री श्री सदुरु बसवारुढ महास्वामीजी मठात सोलापूरच्या नवनिर्वाचित खासदार कुमारी प्रणिती शिंदे यांनी बुधवारी भेट देत आशीर्वाद घेतले. मठाचे संस्थापक श्री ईश्वरानंद आप्पाजी आणि मठाचे मठाधिपती श्री अभिनव शिवपुत्र आप्पाजी यांचे शुभ आशीर्वाद घेतले. दरम्यान लोकसभेचे उमेदवारी जाहीर झाल्यानंतर देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांनी आप्पाजींचे आशीर्वाद घेतले होते. त्यावेळेस श्री ईश्वरानंद आप्पाजी यांनी आमदार प्रणिती शिंदे ह्या सोलापूर लोकसभेमध्ये मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असे संकेत दिले होते. त्या पार्श्वभूमीवर आज रोजी नवनिर्वाचित खासदार प्रणिती शिंदे यांनी आप्पाजींचे शुभ आशीर्वाद घेतले याप्रसंगी माजी केंद्रीय

गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सोलापूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे, कॉंग्रेसचे नेते सुरेश हसापुरे, नगरसेवक बाबा मिस्त्री, कॉंग्रेसचे प्रवक्ते प्राध्यापक अशोक निम्बर्गी, महादेव कोगनुरे, आदींची उपस्थिती होती यावेळी मठाचे संस्थापक श्री ईश्वरानंद आप्पाजी आणि मठाधिपती श्री अभिनव शिवपुत्र अप्पाजी यांनी नवनिर्वाचित खासदार प्रणिती शिंदे यांचा महात्मा बसवेश्वरांची मूर्ती देऊन सन्मान केला. सोलापूर शहराच्या शैक्षणिक सामाजिक औद्योगिक धार्मिक अशा अन्य क्षेत्रामध्ये प्रणिती शिंदेने कार्य करावे यासाठी आमच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी सदैव असल्याचे यावेळी मठाचे संस्थापक श्री ईश्वरानंद आप्पाजी यांनी यावेळी आशीर्वाचन केले.

